**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587



दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे

वर्ष ५ । अंक २०२ । मंगळवार ५ मे २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322







# तक्रारीचे समाधान न झाल्यास थेट माझ्याशी संपर्क करा!

## नूतन पोलीस अधीक्षक सुदर्शन यांचे नगरकरांना आवाहन
## जनतेच्या सेवेसाठी कायम उपलब्ध असल्याचा दिला विश्वास

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर– एखाद्या पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये गैरप्रकार झाल्यास त्या संदर्भात संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली जाते. परंतु त्यावर कारवाई होत नाही किंवा त्याकडे जाणीवपूर्वक कारवाई करण्यासाठी विलंब लावला जात असेल, तक्रार करूनही प्रभारी अधिकारी दखल घेत नसतील तर थेट माझ्याशी संपर्क साधा. मी स्वतः तुमच्या तक्रारीची तात्काळ दखल घेऊन तुमच्या तक्रारीचे निरसन करुन देईल कारण मी तुमच्या सेवेसाठीच आहे तसेच आमचे सर्व अधिकारी व कर्मचारी पण तुमच्या सेवेसाठीच आहेत, असा विश्वास नूतन पोलीस अधीक्षक सुदर्शन यांनी नगरकरांना दिला आहे.**

**अहिल्यागरचे नवे एसपी मुम्मका सुदर्शन यांनी पदभार स्वीकारल्यानंतर प्रथमच पत्रकारांशी संपर्क साधला. यावेळी ते बोलत होते. दरम्यान मला जिल्ह्यात येवून अवघे तीन दिवस झाले आहे. लवकरच एक क्राईम मिटींग घेवून त्याचा आढावा घेवून जिल्ह्यातील प्रश्नांना चालना देवून त्याची सोडवणूक करण्यावर आपला भर राहणार असल्याचेही सुदर्शन यांनी सांगितले.**

### कर्मचारी लाचखोरीत अडकला तर प्रभारी अधिकारी जबाबदार!

शहरासह जिल्ह्यातील विविध प्रश्नांवर चर्चा करण्याबरोबरच गेल्या काही दिवसात जिल्ह्यातील अनेक पोलीस कर्मचारी लाच घेताना रंगेहाथ जाळ्यात अडकले, त्यामुळे पोलिसांची प्रतिमा मलीन होऊन खाकीवर डाग लागला आहे, आपल्या कार्यकाळात आपण यावर विशेष काय भूमिका घेणार असे विचारले असता एसपी सुदर्शन म्हणाले की, लाचलुचपत विभाग करत असलेले काम कौतुकास्पद आहे. परंतु अशा प्रकारच्या कारवाया व्हाव्यात अशी वेळच येऊ नये यासाठी मी विशेष प्रयत्न करणार आहे. त्यासाठी जिल्ह्यातील सर्व प्रभारी अधिकाऱ्यांना कडक सूचना करणार आहे की आपापल्या पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यावर प्रभारी अधिकाऱ्यांचा वचक असला पाहिजे. तुमच्या कर्मचाऱ्यांनी कुणाकडूनही लाच घेऊ नये किंवा लाच मागू नये व पोलीस खात्याची प्रतिमा मलीन होईल असे कृत्य करू नये ही जबाबदारी अधिकाऱ्यांनी स्वीकारून हे असले प्रकार त्वरित बंद करावेत. नाहीतर कारवाईला सामोरे जाण्यासाठी तयार राहावे असा इशाराच एसपी सुदर्शन यांनी दिला.

### महिला-मुलींच्या सुरक्षेसाठी दामिनी पथकाचे काम वाढवणार

शाळा व कॉलेजेसमध्ये मुलींच्या छेडछाडीचे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडत असतात. असे प्रकार घडू नये व महिला तसेच मुलींना सुरक्षित वाटावे यासाठी दामिनी पथकाचे काम अधिक प्रभावीपणे राबवून अशा छेडछाड करणाऱ्यांवर कडक कारवाई करणार आहोत. तसेच ग्रामीण भागातील सर्व पोलीस ठाण्यांतील प्रभारी अधिकाऱ्यांना शाळा व कॉलेज परिसरात गस्त वाढवायला लावून महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी प्रभावीपणे काम करावे अशा सूचना देणार आहे.

### बेशिस्त वाहनचालकांवर कठोर कारवाईचे संकेत

शहरातील वाहतुकीची समस्या लक्षात घेता तसेच शहरात घडत असलेले छोटे-मोठे गुन्हे यामध्ये महिला व मुलींची छेडछाड करणे किंवा महिलांचे गळ्यातील दागिने हिसकावून पळून जाणे अशा प्रकारचे गुन्हे कायम घडत असतात आणि हे गुन्हे करणारे जे गुन्हेगार असतात ते विना नंबरप्लेटची वाहने वापरतात किंवा फॅन्सी नंबरप्लेटची वाहने वापरतात. परंतु अशा विनानंबर व फॅन्सी नंबरप्लेटची वाहने घेऊन चोरी किंवा महिलांची छेडछाड करणारे आरोपी या वाहनावरून प्रवास करत असताना हे वाहन जरी सीसीटीव्हीच्या नियंत्रणात आले तरी पण वाहनावर नंबर नसल्यामुळे किंवा फॅन्सी नंबर असल्यामुळे ते वाहन ट्रेस होत नाही त्यामुळे असे गुन्हेगार मोकाट राहतात, याकडे लक्ष वेधले असता एस पी सुदर्शन यांनी बेशिस्त वाहन चालकांना शिस्तीत आणण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याबरोबरच यापुढील काळात अशा प्रकारचे विना नंबरप्लेट व फॅन्सी नंबर प्लेटची वाहने, नियम मोडणारी वाहने यांच्यावर कठोर कारवाई करणार असल्याचा मनोदय एसपी सुदर्शन यांनी व्यक्त केला.

## स्वगणनेत नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा - सभापती प्रा. राम शिंदे

### सभापतींकडून स्वगणना करून जनतेस आवाहन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** देशाच्या १६व्या राष्ट्रीय जनगणनेला डिजिटल स्वरूपात प्रारंभ झाला असून, नागरिकांच्या सक्रिय सहभागातून ही प्रक्रिया अधिक सक्षम होणार आहे. प्रत्येक नागरिकाने स्वगणना प्रक्रियेत सहभागी होऊन देशाच्या विकासात आपले योगदान द्यावे, असे आवाहन विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले.



सभापती प्रा. राम शिंदे यांनी चौंडी येथे स्वगणना करून जनगणना प्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी टॅबच्या माध्यमातून स्वतःच्या घरगणनेशी संबंधित सर्व माहिती भरल्यानंतर त्यांचा 'सेल्फ एन्युमरेशन आयडी' तयार झाला. या प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव घेत त्यांनी नागरिकांना स्वगणना करण्याचे आवाहन केले व ही पद्धत सोपी, सुरक्षित व वेळ वाचवणारी आहे. दि. १ ते १५ मे या कालावधीत ■ पान ४ वर



शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे अंगारकी चतुर्थी निमित्त भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती या प्रसंगी दाक्षांची आकर्षक सजावट करण्यात आली होती ( छाया- राजू खरपुडे ,नगर)

## नेहरू मार्केट, टॉवर अन् त्याचे हरवलेले स्वर...



अहमदनगर येथील गजबजलेल्या चितळेरोडवरील महानगरपालिकेचे नेहरू मार्केट.. मार्केटच्या सौंदर्यात भर घालणारी वास्तू म्हणजे इथले टॉवर.. सकाळी ही मंडई लोकांनी फुलून जाते. रात्री या रस्त्याच्या बाजूला असलेल्या दुकानाच्या पायऱ्यांवर बसून लोकांच्या गप्पां रंगत असतात. असा हा शहराच्या मध्यवस्तीतील परिसर.रस्ता जणू आम्हा शहरवासियांची जीवनरेखाच सकाळी रोडवरील किराणा, जनरल स्टोअर्स, हॉटेल, मिठाई, विड्याच्या पानाची, घरगुती साहित्याची, हार फुलांची, नारळाच्या दुकानांची गजबज भाजीपाला हातगाड्या देखील असा कोणी नगरकर सापडणार नाही की त्याने या रस्त्यावर खरेदी केली नसेल की भाजी घेतली नसेल मंडईमधे भाजी घ्यायला येणारे नगरकर आजी, काका, काकू, मुली, मुले... असे सारेच हा रस्ता हा आमच्या शहराचा जणु गाभाच...सणांच्या दिवसात इथे खरेदी केली, इथल्या गर्दीत मिसळलं नाहीं तर सण झाल्यासारखाही वाटणार नाही.

इतका हा परिसर, इथली गजबज, केळी, संत्री वाल्या राजुने गिऱ्हाईक आपल्याकडे येण्यासाठी विशिष्ठ आवाजात केलेली मार्केटिंग. हे सारं वातावरण रोमारोमात भिनल्यावर नगरकर असण्याचा आनंद काय असतो हे कळतं. रात्री मंडई समोरील गर्दीची सवय झालेलं पावभाजीचं हॉटेल.. दहा नंतर दुकाने बंद झाल्यावर तिथल्या पायऱ्यांवर रंगलेली मित्रांची, आजूबाजूला राहणाऱ्यांची गप्पांची मैफलत्यातच सायकलवर गरम गरम शेंगदाणे विकत जाणारे काका त्यांच्या हातचे दाणे खातानाची मजाही काही औरच...

अन् या साऱ्या वातावरणाला एकत्र आणणारा, रात्री शतपावलीची सवय झालेल्या, कुटुंबातील सदस्या बरोबर गप्पा मारता मारता ईथे घेऊन यायला लावणारा एक हवाहवासा स्वर... मनाला रुंजी घालणारे संगीत.. म्हणजे पालिकेच्या मंडईवरील टॉवरवर लागलेली भक्ती गीते , सनईचे स्वर.. टॉवर वरील हे स्वर म्हणजे पालिकेच्या रसिकतेची जणु ओळखचं.. आमचं जगणं सुंदर करणारी वास्तूकलेचं सुरेख उदाहरणं असणारी मंडईचाहा टॉवर काही वर्षांपूर्वी विकासाच्या नावाखाली उध्वस्त करण्यात आला. त्यासोबत अनेक घटनांची साक्षीदार असलेली मंडई देखील भुईसपाट करीत क्षणांत सारं काहीं उजाड केलं गेलं. नगरकरांच्या सोनेरी स्मृतींना डोळ्यांदेखत भस्मसात होताना होत असलेल्या वेदनांना कोणालाही फुंकर घालावी वाटली नाहीं.

अन् आपल्या डोळ्यासमोर एक हवाहवासा भूतकाळ काळाच्या पडद्याआड नष्ट होतं गेला..आज हा उजाड परिसर अनेक वर्षांपासून विकासाच्या स्वप्नांच्या शोधात हरवत चाललाय..टॉवर पाडला... त्याबरोबर,पंडितराव नगरकरांच्या भूपाळीने सूरू होणारी या शहराची सकाळ विरून गेली.. रात्रीच्या कट्ट्यावर रंगलेल्या गप्पांच्या मैफिलीला सजवणाऱ्या टॉवर वरील सनईचे मंजुळ स्वर इतिहास जमा झाले.मुलाच्या नोकरी निमीत्ताने इतर शहरात स्थिरावलेला एखादा नगरकर कधी इथे आला की टॉवरच्या आठवणींनी खिन्न होतो.

कधीकाळी या रस्त्यावर भाजी घ्यायला येतं असलेली, आता दुसऱ्या गावात संसारात रमून गेलेली नगरची कन्या माहेरी आली की आई सोबत चितळेरोडला आल्यावर टॉवरची आठवण केल्याशिवाय रहात नाही. असो, मी ही या टॉवरचा भोक्ता होतो. मंडईच्या भिंतीवर असलेली फळांफुलांची शिल्पे वास्तूकलेचा आविष्कार होती. हे देखणेपण पालिका चालवणाऱ्या धुरीनांच्या रसिकतेची, शहरावरील प्रेमाची साक्ष होती... आताचा काळ जुनी गाणी नव्या संगीतात वाजवत त्याला रिमेक करण्याचा आहे. तसंच रिमेक या टॉवरलाही मिळावं, हीच आशा...

अनेक शहरातील चौक मध्यभागी सुंदर, कलात्मक टॉवरने सुशोभित केलेले असतात. हे टॉवर म्हणजे त्या शहरातील पर्यटन स्थळ होतात.परदेशात तर वास्तुकलेचा अप्रतिम नमुना म्हणावा अशा प्रकारची टॉवर असतात. पर्यटकांना ती भूरळ घालतात. आपला नेहरू मार्केटचा टॉवर ही वास्तुकलेचा सुरेख नमुना होता. त्या सोनेरी स्मृतींना पुन्हा नव्याने त्याच छोट्या जागी त्याच प्रकारचा उंच,अधिक सुंदर,नगरकरांना अभिमान वाटावा तसेच शहराच्या सौंदर्यात मोलाची भर पडेल अशा वास्तू रचनेचा टॉवर उभारल्यास हे शहर महापालिकेस नक्कीच दुवा देईल.माननीय आमदार साहेबांनी जर लक्ष घातले तर अवघड मुळीच नाही. हे निश्चित...!




**जयंत येलुलकर,**
अध्यक्ष, रसिक ग्रुप
माजी नगरसेवक, अहिल्यानगर
९६०७३९५१७३


## अहिल्यानगरमध्ये पाणीपुरवठ्याचा बोजवारा

### नागरिक संतप्त । वॉलमनच्या उध्दट वागणुकीविरोधात तीव्र नाराजी, कारवाईची मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** शहर व उपनगरांमध्ये गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाल्याने नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराविरोधात नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक व नागरिकांच्या वतीने महानगरपालिके चे अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर निवेदन सादर करून तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी नगरसेवक निखिल वारे नगरसेवक महेश लोंढे सामाजिक कार्यकर्ते अभिजीत बोरुडे रोहन फडतरे आदीसह नागरिकांनी केली सध्या. उन्हाळ्याचे दिवस सुरू आहे या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याची गरज वाढलेली असताना, वीज वितरणातील अडचणी, भारनियमन तसेच नियोजनाच्या अभावामुळे शहरात वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होत नसल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी नागरिकांना पिण्याचे पाणी मिळवण्यासाठी इतर ठिकाणी भटकंती करावी लागत ■ पान ४ वर

## शिरसाटवाडीतील विकास कामांची शासकीय कमिटीकडून पाहणी, अधिकाऱ्यांकडून कामाचे कौतुक



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पाथर्डी –** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत पाच सदस्यीय शासकीय कमिटीने तालुक्यातील शिरसाटवाडी येथे भेट देऊन गावात झालेल्या विविध विकास कामांची पाहणी केली यावेळी कमिटीचे प्रमुख गटविकास अधिकारी कैलास बळवंत साहेब यांनी गावातील झालेली विकास कामे व सरपंच सौ. भावना पालवे यांचे कौतुक केले.

यावेळी कमिटीने गावातील सिमेंट कॉंक्रीट रस्ते, देवस्थान सभामंडप, भूमिगत गटारे, स्ट्रीट लाईट, सिंगल फेज वीज व्यवस्था, सुसज्य ग्रामपंचायत कार्यालय, अद्ययावत व्यायामशाळा, रेन वॉटर हार्वेस्टिंग यांसह विविध कामांची प्रत्यक्ष पाहणी केली शासन दरबारी पाठपुरावा करून गावात पायाभूत सुविधा निर्माण करणे व त्या माध्यमातून गावाचा विकास साधणे हेच सरपंचाचे प्रमुख काम असते शिरसाटवाडी गावामध्ये मोठ्या प्रमाणावर झालेल्या विकास कामांवर आपण समाधानी असल्याचे मत व्यक्त करत सरपंच सौ. भावना पालवे ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### पंडित हॉस्पिटलमध्ये मोफत अस्थिरोग तपासणी शिबिर

**अहिल्यानगर- महाराष्ट्र अस्थिरोग संघटनेच्या स्थापना दिनानिमित्त येथील पंडित हॉस्पिटल येथे मोफत अस्थिरोग निदान शिबिर व हाडांचा ठिसूळपणा तपासणी कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून जवळपास शंभर रुग्णांनी याचा लाभ घेत आपल्या अस्थिरोगाशी संबंधित विविध समस्यांचे निदान करून घेतले. शिबिरामध्ये रुग्णांची सविस्तर तपासणी करून हाडांची घनता, कॅल्शियमची पातळी, सांधेदुखी, पाठदुखी, मणक्यांचे विकार आदी समस्यांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. तसेच योग्य आहार, व्यायाम, जीवनशैलीतील बदल याबाबतही रुग्णांना सल्ला देण्यात आला. काही रुग्णांना पुढील उपचारांसाठी विशेष सल्ला देण्यात आला.या उपक्रमात ज्येष्ठ नागरिक, महिलावर्ग तसेच तरुणांनाही मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. विशेषतः हाडांचा ठिसूळपणा, गुडघेदुखी व पाठदुखीच्या तक्रारी असलेल्या रुग्णांची संख्या लक्षणीय होती.महाराष्ट्र अस्थिरोग संघटनेच्या वतीने १ मे ते ७ मे दरम्यान राज्यभर 'अस्थिरोग आरोग्य सप्ताह' राबविण्यात येत असून, त्याअंतर्गत विविध जिल्ह्यांतील रुग्णालयांमध्ये अशाच प्रकारची मोफत तपासणी शिबिरे, जनजागृती कार्यक्रम आणि मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना आधुनिक अस्थिरोग उपचार, वेळेवर निदान आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती देण्याचा संघटनेचा प्रयत्न आहे. हाडांचे आरोग्य जपणे, कॅल्शियमयुक्त आहाराचे महत्त्व, नियमित व्यायामाची गरज याबाबतही जनजागृती केली जात आहे. अस्थिरोग संघटनेचे संचालक व अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. राहुल पंडित यांनी नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घेऊन आपल्या हाडांच्या आरोग्याबाबत जागरूक राहावे, तसेच लक्षणे दिसताच त्वरित तपासणी करून घ्यावी, असे आवाहन केले आहे.**

### राहुरीतील कनगर येथे १४ मे रोजी ना. आठवले यांचा नागरी सत्कार

**अहिल्यानगर - रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री यांची तिसऱ्यांदा राज्यसभेवर निवड झाल्याबद्दल अहिल्यानगर जिल्हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने भव्य नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सत्कार सोहळा कनगर (ता. राहुरी) येथे १४ मे रोजी सायंकाळी ठीक ७ वाजता संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर दक्षिण जिल्ह्याच्या नियोजनासाठी महत्त्वपूर्ण बैठक गुरुवार, ७ मे रोजी मिरजगाव (ता. कर्जत) येथे दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आली आहे. दक्षिण जिल्हाध्यक्ष सुनिल साळवे यांनी ही माहिती देत, या बैठकीला दक्षिण विभागातील सर्व तालुका अध्यक्ष, तालुका कार्यकारिणी सदस्य आणि प्रमुख कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. मिरजगाव येथील हॉटेल शिवममध्ये होणाऱ्या या बैठकीत सत्कार सोहळ्याच्या नियोजनाचा आढावा घेऊन विविध जबाबदाऱ्या निश्चित केल्या जाणार आहेत. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आवश्यक नियोजन, कार्यकर्त्यांची भूमिका, तसेच जनसंपर्क मोहीम यावर सविस्तर चर्चा होणार आहे. या बैठकीसाठी पक्षाचे संपर्कप्रमुख तथा राज्य उपाध्यक्ष श्रीकांत भालेराव, राज्य उपाध्यक्ष विजयराव वाकचौरे, उत्तर महाराष्ट्राचे नेते राजाभाऊ कापसे, विभागीय अध्यक्ष भीमा बागुल, उत्तर जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, नगर शहर जिल्हाध्यक्ष किरण दाभाडे, जिल्हा कार्याध्यक्ष लॉरेन्स स्वामी, जिल्हा सरचिटणीस विजय भांबळ यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.**

## सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये पूर्व प्राथमिक विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभ दिमाखात



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहमदनगर सिंधी एज्युकेशन सोसायटीच्या सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये पूर्व-प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभ दि. २९ एप्रिल २०२६ रोजी अत्यंत उत्साहपूर्ण व दिमाखदार वातावरणात पार पडला. या समारंभासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून सी.ए. शबनम हर्दवानी धुप्पड यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या मनमोहक स्वागत नृत्याने झाली. त्यानंतर सौ. कनन शेरवानी व सौ. करिश्मा शेख यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून कार्यक्रमाची प्रस्तावना सादर केली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून देत त्यांचा पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

पूर्व-प्राथमिक विभागाच्या प्राचार्या सौ. कांचन पापडेजा यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देत त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रेरित केले. तसेच माध्यमिक विभागाच्या प्राचार्या गीता तांबे यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, शिस्त व चिकाटीच्या बळावर यश संपादन करण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सी.ए. शबनम हार्दवानी धुप्पड यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात पालकांना मुलांना सकारात्मक पद्धतीने घडविण्याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमादरम्यान शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये यूकेजी 'अ' मधील बानी कौर गुलाटी व यूकेजी 'ब' मधील ज्योत्सना बाळासाहेब पठारे यांचा विशेष गौरव करण्यात आला. पालक प्रतिनिधी म्हणून श्री. सुमित अधात व सौ. रेणुका ब्रह्मे यांनी मनोगत व्यक्त करून शाळेच्या कार्याचे कौतुक केले. तसेच वर्गशिक्षिका सौ. गुंजन पंजवानी व सौ. दीपा आहुजा यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. अमऋता कारामुंगे व जूही पर्यानी यांनी परिश्रम घेतले.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष रामचंद् मेंघानी उपाध्यक्ष श्री. रूपचंद मोटवानी, सचिव श्री. गोपाल भागवानी, खजिनदार श्री. दामोधर माखिजा, विश्वस्त श्री. सुरेश हिरानंदानी व श्री. राजकुमार गुरुनानी महेश मध्यान हरेश मध्यान तसेच प्राचार्या गीता तांबे व मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा उपस्थित होत्या. मान्यवरांनी सर्व पदवीधर विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. संस्थेचे विश्वस्त श्री. सुरेश हिरानंदानी यांनी पूर्व-प्राथमिक विभागातील सर्व पदवीधरांचे अभिनंदन केले आणि विद्यार्थ्यांच्या जडणघडणीसाठी अथक परिश्रम घेतल्याबद्दल पूर्व-प्राथमिक शिक्षकांचे कौतुक केले.

इयत्ता पहिलीच्या वर्गशिक्षिका नम्रता कुकरेजा आणि प्रीती कटारिया यांचा परिचय करून देण्यात आला.समारंभात यूकेजी 'अ' व 'ब' च्या विद्यार्थ्यांचा पदवीदान सोहळा विधिवत पार पडला. कार्यक्रमाच्या शेवटी सौ. कनन शेरवानी व सौ. करिश्मा शेख यांनी आभार प्रदर्शन करून उपस्थितांचे ऋण व्यक्त केले.

लोकशाहीच्या मूल्यांवर भाष्य करणारा एक धारदार विशेष लेख

## लोकशाहीचा गळा कोणी घोटला?

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे एका चार वर्षांच्या चिमुरडीवर झालेला अत्याचार आणि तिची झालेली निर्घृण हत्या ही केवळ एक गुन्हेगारी घटना नाही, तर तो आपल्या व्यवस्थेच्या चिंधड्या उडवणारा क्रूर प्रकार आहे. जेव्हा एखादी चिमुरडी आपल्याच समाजात सुरक्षित नसते, तेव्हा आपण कोणत्या तोंडाने लोकशाहीचा उत्सव साजरा करतो? हा प्रश्न आज प्रत्येक सुज्ञ नागरिकाच्या मनात घर करून बसला आहे.

**स्वातंत्र्याचा अर्थ आणि चिमुरडीचा आक्रोश**

लोकशाही आपल्याला अभिव्यक्ती स्वातंत्र्य देते, जगण्याचा अधिकार देते आणि सन्मानाने वावरण्याची हमी देते. पण ज्या व्यवस्थेत एका चार वर्षांच्या बालिकेला स्वतःचा जीव वाचवता येत नाही, तिथे हे स्वातंत्र्य नक्की कोणासाठी आहे? नराधमांच्या विकृतीला बळी पडलेल्या त्या चिमुरडीचा आक्रोश लोकशाहीच्या चारही खांबांना हादरा देणारा आहे. जर कायदा आणि सुव्यवस्था गुन्हेगारांच्या मनात दहशत निर्माण करू शकत नसेल, तर समजून जावे की लोकशाहीचा श्वास गुदमरत आहे.

**व्यवस्थेचे अपयश की समाजाची विकृती?**

अशा घटना घडल्यानंतर आपण मेणबत्त्या पेटवतो, मोर्चे काढतो आणि काही काळानंतर पुन्हा शांत होतो. पण प्रश्न कायम राहतो लोकशाहीचा गळा नक्की कोणी घोटला? १.कायद्याची संथ गती: गुन्हेगाराला कायद्याचा धाक उरलेला नाही. वर्षानुवर्षे चालणारे खटले आणि शिक्षेची अनिश्चितता नराधमांचे धाडस वाढवत आहे.

२.सामाजिक मानसिकता: ज्या समाजात बालकांकडे वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत होते, त्या समाजाची नैतिक घसरण लोकशाहीला मारक आहे. ३. सुरक्षिततेचा अभाव: बेटी बचाओ सारख्या घोषणा केवळ भिंतीवरच्या घोषणा राहिल्या आहेत की काय, अशी भीती नसरापूरच्या या घटनेने निर्माण केली आहे.

**गळा घोटणाऱ्यांचा हिशोब हवा!**

लोकांनी व्यक्त केलेला संताप रास्त आहे. जो लोकशाहीने दिलेल्या अधिकारांचा गैरवापर करून निष्पापांचे आयुष्य संपवतो, त्याला त्याच लोकशाहीने दिलेल्या अधिकारांची कवचकुंडले कशासाठी? संविधानाने दिलेला जगण्याचा अधिकार हा गुन्हेगारांसाठी नसून सज्जन नागरिकांसाठी असावा. जेव्हा कायदा अशा राक्षसी प्रवृत्तींचा गळा कायद्याच्या फासाने आवळत नाही, तेव्हा लोकशाही कमकुवत होत जाते.

**आता बदला हवा...**

केवळ हळहळ व्यक्त करून चालणार नाही. नसरापूरच्या त्या पीडितेला न्याय मिळवून देणे ही केवळ पोलिसांची जबाबदारी नाही, तर ती संपूर्ण व्यवस्थेची परीक्षा आहे. हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून, आरोपीला अशा पद्धतीची शिक्षा व्हायला हवी की, पुन्हा कोणाही नराधमाची लोकशाहीच्या या नंदनवनात असं क्रूर कृत्य करण्याची हिंमत होणार नाही.

निष्कर्ष: जोपर्यंत नराधमांना कायद्याचा फास बसत नाही आणि समाजातील विकृती संपत नाही, तोपर्यंत लोकशाहीचा गळा घोटला जातच राहणार. आज गरज आहे ती केवळ निषेधाची नाही, तर कठोर न्यायाची आणि प्रत्येकाच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण करण्याची.

**■ कमलेश गायकवाड**
**पत्रकार**

## रामकृष्णाच्या विद्यार्थ्यांनी मिळवले घवघवीत यश



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशन अंतर्गत सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स ज्युनियर कॉलेजचा इयत्ता बारावी (विज्ञान व वाणिज्य) शाखेचा २०२५२६ चा निकाल उल्लेखनीय लागला आहे. विज्ञान शाखेचा निकाल ९७.५ % तर वाणिज्य शाखेचा १०० % नोंदवण्यात आला.

विज्ञान शाखेत खुशी प्रकाश तिपुळे हिने ८५.६७ % गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. हर्षल संदीप फसळे (८०.३३ %) द्वितीय, तर अन्वेषा विवेक मंत्री (७९.१७ %) तृतीय क्रमांकावर राहिली. विषयानुसार गुणवत्तेत इंग्रजीत नेहल अविनाश चारगुंडी (९०/१००), रसायनशास्त्र व भौतिकशास्त्रात खुशी तिपुळे (७४/१०० व ८३/१००), तर जीवशास्त्रात यश्वी हर्षल पटेल (७७/१००) गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला. गणित विषयात अनया अमोल तांबोळी व मानसी मेघराज चाकोर यांनी प्रत्येकी ९८/१०० तसेच भूगोल व माहिती तंत्रज्ञानात निमिष रुपेश शिदोरे याने अनुक्रमे ९५/१०० व ९७/१०० गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. इलेक्ट्रॉनिक्स विषयात हर्षल फसळे याने २०० पैकी १७९ गुण मिळवत लक्षवेधी यश संपादन केले.

वाणिज्य शाखेत मेहेक भूषण डुंगरवाल हिने ९४.५० % गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. रिया किरण माणियार (९२.८३ %) द्वितीय, तर प्रणव विजय वाघमारे (९१.८३ %) तृतीय क्रमांकावर राहिला. विषयानुसार गुणवत्तेत इंग्रजीत मेहेक डुंगरवाल (९०/१००), अकाउंटन्सीत रिया माणियार व शुभ दीपक खंडेलवाल (१००/१००), तसेच ऑर्गनायझेशन ऑफ कॉमर्समध्ये प्रिशा प्रविण अगरवाल (९५/१००) यांनी प्रथम क्रमांक मिळवला.

गणितात रोहन मनीष बोरा (९६/१००), सेक्रेटेरियल प्रॅक्टिसमध्ये कनिष्क हनीश सबलोक (८७/१००), तर माहिती तंत्रज्ञानात मेहेक डुंगरवाल (९७/१००) यांनी उच्च गुण मिळवले. अर्थशास्त्र विषयात कनिष्क सबलोक, दिव्यांका किशोर तलरेजा व जय संजय गांधी यांनी प्रत्येकी ९९/१०० गुण मिळवत विशेष प्रावीण्य मिळवले.

विद्यार्थ्यांच्या या यशासाठी अपराईज अकॅडमीचे सीए उमेश डोडेजा, सी ए चिराग कासवा, सौ प्रज्ञा मुनोत, श्री आशिष तटू तसेच संस्थेचे शिक्षक सौ वृषाली पितळे, सौ शिल्पा दिवटे, सौ सरला काथेड, सौ नितल फिरोदिया, ध्रुवा परदेशी, श्री श्रेया कुमार गुंडू, श्री अजित लोळगे यांनी विशेष परिश्रम घेतले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. श्रीगोपाल धूत, संस्थेचे उपाध्यक्ष व शाळा समितीचे चेअरमन श्री.नंदकुमार झवर, उपाध्यक्ष श्री. मोहनलाल मानधना व श्री. राजेश झवर, सचिव डॉ. शरद कोलते, उपसचिव श्री. बजरंग दरक, प्राचार्या गगनदीप वाधवा आणि उपप्राचार्या संपदा देशपांडे समन्वय सुषमा उजागरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## आडूळमध्ये पाण्यासाठी टाहो; महिलांसह चिमुकल्यांची वणवण

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यातील आडूळ तांड्यावर पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली असून, हंडाभर पाण्यासाठी महिलांसह लहान मुलांना दररोज मैलोनमैल भटकंती करावी लागत आहे. उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे पाण्याचे स्रोत आटल्याने नागरिकांचे हाल होत आहेत.

तांड्यावर पिण्याच्या पाण्याची कोणतीही ठोस व्यवस्था नसल्याने महिलांची पहाटेपासूनच पाण्यासाठी धावपळ सुरू होते. डोक्यावर हंडे घेऊन त्या लांबच्या विहिरी व पाणवठ्यांकडे निघतात. अनेकदा पाणी भरण्यासाठी तासन्तास रांगा लावाव्या लागत असून, या त्रासात चिमुकल्यांनाही सहभागी व्हावे लागत आहे.

आडूळसह खडकवाडी, जामवाडी आदी तांड्यांमध्येही परिस्थिती गंभीर आहे. विहिरींची पाणीपातळी घटल्याने टंचाई अधिकच तीव्र झाली असून, काही ठिकाणी नागरिकांना पैसे देऊन पाणी विकत घ्यावे लागत आहे. त्यामुळे आर्थिक भारही वाढत आहे.

दरम्यान, ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी केली आहे. "उन्हाळा आला की पाण्यासाठीची वणवण वाढते. प्रशासनाने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात," अशी मागणी स्थानिकांनी व्यक्त केली.

पाणीटंचाईमुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## कंत्राटी कर्मचाऱ्यांना फिक्स पे,कर्मचाऱ्यांना १० लाखांचा विमा

### साई संस्थान क्रेडिट सोसायटीचा निर्णय

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जागतिक कामगार दिनाचे औचित्य साधून श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी च्या वतीने कामगारांसाठी विविध कल्याणकारी निर्णयांची घोषणा करण्यात आली. या कार्यक्रमात संस्थेच्या ४७ ज्येष्ठ कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे बेसिक लागू करण्यात आले असून, सर्व कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय भत्त्यात ५०० रुपयांची वाढ करण्यात आली आहे.

सोसायटीच्या विद्यमान संचालक मंडळाने कर्मचाऱ्यांच्या हिताचे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय मार्गी लावले असून त्यात प्रामुख्याने २५ वर्षे सेवा पूर्ण केलेल्या ४७ कायम कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगाचा लाभ देण्यात आला. ३३ कंत्राटी कर्मचाऱ्यांना आता फिक्स पे वेतनावर घेण्यात आले आहे, ज्यामुळे त्यांच्या आर्थिक उत्पन्नात स्थिरता येईल.

सभासदांप्रमाणेच आता कर्मचाऱ्यांचाही १० लाख रुपयांचा नैसर्गिक विमा उतरवण्यात आला आहे. याच योजनेतंर्गत दिवंगत कर्मचारी श्री. श्रीमंत गोविंद पाटील यांच्या वारसांना १० लाख रुपयांच्या विम्याचे वाटप करण्यात आले. दिवंगत श्री. श्रीमंत गोविंद पाटील यांच्या वारस श्रीमती शितल पाटील यांना संस्थेच्या सेवेत फिक्स पे तत्त्वावर सामावून घेण्यात आले आहे. संस्थेच्या १२९ कायम कर्मचाऱ्यांना ग्रॅज्युएटी नियम लागू करण्यात आले असून, कर्मचाऱ्यांसाठी पुन्हा कर्ज वाटप योजना सुरू करण्यात आली आहे.संचालक मंडळाने घेतलेल्या या ऐतिहासिक निर्णयांमुळे कर्मचारी वर्गात आनंदाचे वातावरण आहे.

सदर प्रसंगी संस्थेचे चेअरमन श्री विठ्ठल तुकाराम पवार पा., व्हा. चेअरमन श्री पोपटराव भास्करराव कोते पा, संचालक श्री महादु बापू कांदळकर, श्री कृष्णा नाथा आरणे, भाऊसाहेब चांगदेव कोकाटे पा., श्री संभाजी शिवाजी तुरकणे पा., श्री देविदास विश्वनाथ जगताप, श्री विनोद गोवर्धन कोते पा., श्री मिलींद यशवंत दुनबळे, श्री तुळशिराम रावसाहेब पवार पा., श्री रविंद्र बाबु गायकवाड, श्री भाऊसाहेब लक्ष्मण लवांडे पा., श्री इक्बाल फकिरमहंमद तांबोळी, सौ. सुनंदा किसन जगताप पा., सौ. लता मधुकर बारसे पा., श्री रंभाजी काशिनाथ गागरे, तज्ञ संचालक श्री भाऊसाहेब भानुदास लबडे पा. संस्थेचे सचिव श्री विलास गोरखनाथ वाणी पा. सह. सचिव श्री बाबासाहेब शंकरराव अनर्थे पा. व सहा. सह. सचिव श्री संभाजी सोपानराव कोते पा. तसेच संस्थेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रगत माध्य.व उच्च माध्य. विदयालयाचा १२ वी विज्ञान शाखेचाचा निकाल १०० टक्के तर वाणिज्य शाखेचा निकाल ६० टक्के

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या प्रगत उच्च माध्यमिक विभाग इ. १२ वी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी / मार्च २०२६ विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला आहे.

विज्ञान शाखेत विधाते हर्षवर्धन शिवाजी हा ८५.६७ टक्के घेऊन प्रथम क्रमांक, चन्ना वैभव प्रमोद हा ८३.१७ टक्के घेऊन द्वितीय क्रमांक तर पोटदुखे ऋतुजा अशोक ही ७६.६७ टक्के घेऊन तृतीय क्रमांक मिळवला आहे. तसेच वाणिज्य शाखेचा निकाल ६० टक्के लागला आहे. वाणिज्य शाखेत नामदे अवनी चित्तरंजन ८६.५० टक्के घेऊन प्रथम क्रमांक, गुगळे कार्तिक राहुल ८२.३३ टक्के घेऊन द्वितीय क्रमांक तर नागपाल मेहक विशाल ८१.८७ टक्के घेऊन तृतीय क्रमांक मिळवला आहे.

सर्व यशस्वी विदयार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा विजया चंद्रकांत रेखे, सचिव किरण वैकर, उपाध्यक्ष चंद्रशेखर कुलकर्णी, खजिनदार उमेश चंद्रकांत रेखे, का. सदस्य महेश चंद्रकांत रेखे, उदयकुमार भणगे, उमेश नगरकर, प्राचार्य सुनिल पंडित, सर्व विभाग प्रमुख व हर्षाली देशमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## ध्वनीप्रदूषणमुक्त विवाह सोहळ्यात पारंपारिक वाद्य संस्कृतीचे दर्शन

### शिपणकर परिवाराचा कौतुकास्पद उपक्रम

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** प्रदुषणकारी डीजे ध्वनीक्षेपकाचा वापर टाळून विवाह समारंभात पारंपारिक वाद्यसंस्कृतीचे दर्शन घडविण्याचा कौतुकास्पद उपक्रम येथील शिपणकर व राहटाळ परिवाराने राबविला आहे.

अहिल्यानगर येथील मुद्रण क्षेत्रातील प्रतीथयश उद्योजक चंद्रकांत शिपणकर यांचे चिरंजीव संदीप व घोडेगाव (ता. नेवासा) येथील जालिंदर राहटाळ (इखे) यांची कन्या आकांक्षा यांचा विवाह नुकताच पार पडला. या सोहळ्यात वधू-वर पक्षाच्या समन्वयाने डीजे ध्वनिक्षेपकाऐवजी पर्यावरणपूरक आणि संस्कृती जतनाच्या उद्देशाने सनई, सुर, संबळ, हलगी, ताशा, चौघडा, तुतारी यांसारख्या पारंपरिक वाद्यांच्या सुरावटीत वधूवर विवाहबद्ध झाल्याने उपस्थितांना शिवकालीन वाद्य संस्कृतीचे दर्शन घडले. नेवासा तालुक्यातील जेऊर हैबती येथील शिवशंभो सनई चौघडा वाद्य पार्टीचे फुलमाळी बंधू व त्यांच्या सहकाऱ्यांनी पारंपारिक वाद्यांचे उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. "विवाह समारंभात होणारे ध्वनीप्रदूषण टाळण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असून इतरांनीही या पथदर्शी उपक्रमापासून प्रेरणा घेणे ही काळाची गरज आहे.

डीजेच्या कर्कश्य आवाजामुळे होणारे ध्वनीप्रदूषण मानवी शरीराला तसेच संपूर्ण सजीव सृष्टीला अतिशय धोकादायक आहे. त्यामुळे विवाह समारंभामध्ये नागरिकांनी डीजे ऐवजी पारंपारिक वाद्यवृंदाचा वापर करून महाराष्ट्राची संस्कृती जपण्याचे कार्य करावे असे आवाहन हरिभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय ललवाणी यांनी केले.या विवाह सोहळ्यास सामाजिक, राजकीय व मुद्रण क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.


**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक – तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

## परिक्रमा सायन्स कॉलेजची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

अहिल्यानगर- श्रीगोंदा तालुक्यातील ना.श्री.बबनराव पाचपुते विचारधारा ट्रस्ट चे परिक्रमा सायन्स कॉलेज या विद्यालयाचा इयत्ता बारावी फेब्रु/मार्च २०२६ परीक्षेचा निकाल महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ यांचेकडून जाहीर झाला असून यामध्ये विज्ञान शाखेतून ८७.१७% गुण मिळवून प्रथम अनुष्का गणेश जाधव ८६.८३% गुण मिळवून द्वितीय मयूर किरण यादव तर ८६.६७% गुण मिळवून दीप अतुल लगड तृतीय आला. वाणिज्य शाखेत संदीप रमेशकुमार चौधरी ८८.६७% गुण मिळवून प्रथम यश पोपट काळे ८४.३३% गुण मिळवून द्वितीय तर अथर्व प्रकाश तोडकर ६४.५०% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळाला आहे.अशी अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला असून विद्यालयाचा विज्ञान शाखेचा एकूण निकाल ९९.७०% व वाणिज्य शाखेचा एकूण निकाल १००% एवढा लागला. तरी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक माजी मंत्री.श्री.बबनरावजी पाचपुते, संस्थेच्या अध्यक्षा डॉ.सौ. प्रतिभाताई पाचपुते, संस्थेचे सचिव श्री.आ.विक्रमसिंह पाचपुते संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड.श्री.प्रतापसिंह पाचपुते,अकॅडेमीक डायरेक्टर सौ.डॉ.इंद्रायणी पाचपुते, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.प्रा.अनिल पुंड सर, डेप्युटी अकॅडेमीक डायरेक्ट डॉ.संजीव कदम पाटील, विद्यालयाचे प्राचार्य डॉ. इथापे पी.ए.व सर्व विभागाचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. व पुढील शैक्षणिक प्रगतीस शुभेच्छा दिल्या.

## अनेक शाळांकडून आरटीइ प्रवेशा करिता डोनेशनची मागणी

अहिल्यानगर- शहरातील शिक्षण व्यवस्थेने बाजार मांडलाय राज्य शासन आदेश नुसार शाळेतून किंवा ठरवून दिलेल्या दुकानातून पुस्तके, गणवेश खरेदीची सक्ती शाळांनी करू नये शासन परिपत्रक नव्याने काढून असे आदेश देऊन देखील शासन आदेश जवळपास सर्वच शाळांनी धाब्यावर बसविले आहेत. त्यांच्यावर अंकुश ठेवणारी शिक्षण व्यवस्था सुध्दा बरबटलेली दिसते शासन आदेश देऊन शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी सांगून सुध्दा अहिल्या नगर शहर तसेच जिल्ह्यातील अनेक शाळा वह्या,पुस्तके ,गणवेश, खरेदी शाळातून तसेच विशिष्ट दुकानातून खरेदीकरिता सक्ती करीत आहे. अश्या हुकूमशाही पद्धतीने शिक्षण संस्था चालविणाऱ्या संचालकांना शिक्षण अधिकारी तसेच शहरातील प्रशासन अधिकारी आर्थिक लागेबांधे असल्यामुळे साथ देत असून शाळांवर कुठल्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. गोरगरीब विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे या करिता राज्य सरकारने आर टी इ प्रवेश प्रक्रिये मध्ये २५% मोफत प्रवेश असताना सुध्दा हजारो रुपयांची डोनेशन ची मागणी विविध इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडून पालकांना केली जात आहे. त्यामुळे अजून अनेक मुले प्रवेशापासून वंचित आहेत. या मध्ये सुध्दा शिक्षण विभागाचे संस्थांशी आर्थिक लागेबांधे असल्यामुळे लक्ष्य घालताना दिसत नाही. त्यामुळे मुख्यमंत्री तसेच शिक्षण मंत्री यांनी लक्ष घालून या सर्व शाळांची चौकशी करून कारवाई करावी असे निवेदन युवा नेते नितीन भुतारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसेच शिक्षण मंत्री दादा भुसे यांना मेल करून निवेदन पाठविले आहे. कुठल्याही विद्यार्थ्यांना आर टी इ प्रवेश घेण्याकरिता डोनेशन पैश्यांची मागणी होत असेल तसेच शाळांनी वह्या पुस्तके शाळेकडून किंवा एका विशिष्ट दुकानातून खरेदीकरिता सक्ती केली जात असेल अशा पालकांनी नितीन भुतारे यांना ७३०४६१२१२१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर मेसेज करावा असे आवाहन केले आहे.

## निवृत्त तहसीलदार सुरेश हरके यांचे निधन



अहिल्यानगर - भिंगार येथील रहिवासी निवृत्त तहसीलदार सुरेश विश्वनाथ हरके यांचे आज दि. ४ मे २०२६ रोजी सकाळी ७.०५ वाजता दीर्घ आजाराने निधन झाले. ते ८१ वर्षांचे होते. त्यांच्यावर भिंगार येथील लिंगायत कोष्टी समाजाच्या स्मशानभूमीत सायंकाळी ५.३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे. ध्यानधारणा प्रशिक्षक डॉ. दीपक हरके यांचे ते वडील होत. स्व. सुरेश हरके त्यांच्या निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# सारडा महाविद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम - डॉ.पारस कोठारी

### सारडा महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सारडा महाविद्यालयाच्या बारावीच्या कला,वाणिज्य व विज्ञान शाखेतील इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांनी परीक्षेत उत्तम यश सपादन केले आहे. प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित,कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.गिरीश पाखरे व डॉक्टरेट असलेला प्राध्यापक वर्ग यांचे उत्तम मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले आहे.विद्यार्थ्यांनी परिश्रम व मेहनत घेऊन यश मिळविले आहे.सारडा महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. असे प्रतिपादन डॉ.पारस कोठारी यांनी केले आहे.

हिंदसेवा मंडळाच्या सारडा महाविद्यालयात इयत्ता बारावीच्या कला,वाणिज्य व विज्ञान विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी,ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा,कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, कार्य.सदस्य मधूसुदन सारडा,प्रा.ज्योती कुलकर्णी, अनंत देसाई,प्राचार्य प्रा.डॉ.माहेश्वरी गावित कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.गिरीश पाखरे,पर्यवेक्षक प्रा.सुजित कुमावत आदी उपस्थित होते.

सुमतीलाल कोठारी म्हणाले,''कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी परीक्षेत चांगले यश मिळविले आहे.या महाविद्यालयाचे विद्यार्थी एमबीबीएस, शास्त्रज्ञ,इंजिनिअर,आयआयटी क्षेत्रात प्रवेश मिळवून यशस्वी होत असतात. अभ्यासाबरोबरच या महाविद्यालयात खेळालाही प्राधान्य दिले जाते.प्रणिता सोमन ही विद्यार्थिनी भारतीय संघात खेळत आहे.तर दोन विद्यार्थ्यांना शिवछत्रपती पुरस्कार मिळाले आहेत.

ब्रिजलाल सारडा म्हणाले,श्रीमद् भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे ज्ञानासारखी कोणतीच गोष्ट पवित्र नाही.हिंद सेवा मंडळाचा ज्ञानदानाचा यज्ञ शंभर वर्षांपासून अविरतपणे सुरू आहे.महात्मा गांधी लोकमान्य टिळक,थोर समाज सुधारक महात्मा फुले, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेले सर्वसामान्यांना शिक्षण देण्याचे कार्य हिंद सेवा मंडळ अविरतपणे करीत आहे.यशस्वी विद्यार्थ्यांनी उच्चशिक्षित होऊन देशासाठी कार्य करावे.

मधुसूदन सारडा म्हणाले, यश मिळवायचे असेल तर संघर्ष करावा लागतो.संघर्षा विना मिळालेले यश फार काळ टिकत नाही.परीक्षेत मिळालेल्या यशामुळे तुमच्या पंखात बळ मिळाले आहे.उंच भरारी घेऊन जीवनात यशस्वी व्हावे.

प्राचार्य माहेश्वरी गावित म्हणाल्या,''कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता बारावीच्या परीक्षेत मागील वर्षीपेक्षा उत्तम यश सपादन केल्याने महाविद्यालयाचा प्रगतीचा चढता आलेख आहे. महाविद्यालयाची निकालाची परंपरा विद्यार्थ्यांनी कायम ठेवले आहे.ही अभिमानास्पद बाब आहे. यशस्वी विद्यार्थ्यांच्या पाठीवर थाप देण्यासाठी हिंदसेवा मंडळाचे सर्व पदाधिकारी आवर्जून उपस्थित आहेत. विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील मान्यवर मार्गदर्शन करण्यासाठी वर्षभर येत असतात.तसेच सांस्कृतिक कार्यक्रम स्नेहसंमेलन व क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले जाते.यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

या कार्यक्रमाला हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक,मानद सचिव संजय जोशी,ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा,अँड.अनंत फडणीस,डॉ. रमेश झरकर यांनी शुभेच्छा दिल्या.

# पश्चिम बंगाल, असम, पुडुचेरी राज्यात भाजपची सत्ता आल्याबद्दल जल्लोष व पेढे वाटप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भाजपा पक्ष कार्यालय व भिंगारवाला चौक, कापड बाजार येथे पश्चिम बंगाल, असम, पुडुचेरी, या राज्यात भारतीय जनता पार्टी ची सत्ता आली आहे या मिळालेल्या भरघोस यशाबद्दल भारतीय जनता पार्टीचे वतीने शहरजिल्हाअध्यक्ष अनिल मोहिते यांच्या प्रमुख उपस्थितीत पेढे वाटून जल्लोष साजरा करण्यात आला .सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी, नगरसेवक यांनी आदी मोठया संख्येने उपस्थित होते.

अनिल मोहिते म्हणाले की संपूर्ण देशात मोठा विजय भारतीय जनता पार्टीला मिळाला आहे पश्चिम बंगालमध्ये जो विजय मिळविला तो ऐतिहासिक विजय असून २०० जागा जिंकून पश्चिम बंगालमध्ये भाजपा सत्तेत येते आणि पुढच्या काळात तेथील बांगलादेशी रोहिंगे यांना बाहेर काढण्याचा काम आमचे भारतीय जनता पार्टी पश्चिम बंगालमधील सरकार करेल पतप्रंधान नरेंद्र मोदी है तो सबकुछ मुमुकीन है असा नारा देउन देशात ही घोडदौड भाजपाची चालली आहे यांचा आनंद येथे व्यक्त केला. तसेच राहुरी पोटनिवडणुकीत जो अभुतपूर्व विजय मिळाला राहुरीचे उमेदवार अक्षय शिवाजीराव कर्डीले यांना लोकांनाही भरभरून मते दिल्याने मोठा विजय मिळाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण,पालकमंत्री राधाकृष्ण विखे,माजी खासदार डॉ सुजय विखे यांच्या प्रयत्नातून राहुरीचा विजय साजरा झाला आहे या यशाची घोडदौड अशीच चालू राहील अशी अपेक्षा व्यक्त करतो.

सरचिटणीस निखिल वारे, मुकुल गंधे, महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रिया जानवे,कालिंदी केसकर, गीता गिल्डा,ज्योती दांडगे,संध्या पावसे,छाया रजपूत, सुरेखा जंगम, लीला अग्रवाल, रेखा मैड, युवा मोचाचे रूदेश अंबाडे, महावीर कांकरीया,राहुल जामगावकर,अनिल सबलोक, बाबासाहेब सानप, ज्ञानेश्वर काळे, धिरज दायमा,भागव फुलारे,राजेंद्र फुलारे,साहील ओझा,राजू विदये,लक्ष्मीकांत तिवारी,देवेंद्र बंब,अजय ढोणे,अजिक्य गुरावे आदीसह मोठया संख्येने कार्यकते उपस्थित होते.

# नसरापूर अत्याचार प्रकरण; नराधमास फाशीची मागणी

### रिपाइंचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; रिपाइ आक्रमक



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे ३ वर्षीय चिमुरडीवर झालेल्या अमानुष लैंगिक अत्याचार व निर्घृण हत्येच्या घटनेने संपूर्ण राज्य हादरले आहे. या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) यांच्या वतीने आरोपीला तातडीने फाशीची शिक्षा सुनावण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या संदर्भात पक्षाच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी पंकज आशिया यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के यांच्यासह दानिश शेख, विजय शिरसाठ, गुलाम शेख, स्वप्नील साठे, अभिजित पंडित, योहान चाबुकस्वार, जमीर सय्यद, चिकू गायकवाड, निजाम शेख, जावेद सय्यद, इम्रान शेख, संपदा म्हस्के, मनीषा गायकवाड, विश्रांती पठारे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, भीमराव कांबळे या विकृत प्रवृत्तीच्या व्यक्तीने केवळ तीन वर्षांच्या निष्पाप चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करून तिची दगडाने ठेचून अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या केली. ही घटना संपूर्ण मानवतेला काळिमा फासणारी असून, समाजमनाला सुन्न करणारी आहे. या घटनेमुळे पुरोगामी महाराष्ट्राची मान शरमेने खाली गेली आहे, असेही निवेदनात म्हटले आहे.

विशेष म्हणजे, संबंधित आरोपीवर यापूर्वीही लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल होता आणि त्याने शिक्षा भोगून बाहेर आल्यानंतर पुन्हा असे घृणास्पद कृत्य केल्याचे समोर आले आहे. त्यामुळे अशा प्रवृत्तीच्या गुन्हेगारांना जिवंत राहण्याचा अधिकार नाही, असे तीव्र मत रिपाइच्या वतीने व्यक्त करण्यात आले.

तसेच, बाल लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी लागू असलेला 'पॉक्सो' कायदा () अधिक कठोर करण्याची मागणी करण्यात आली आहे. अशा गुन्ह्यांमध्ये आरोपी कोणत्याही परिस्थितीत सुटू नये, यासाठी न्यायव्यवस्थेत आवश्यक त्या सुधारणा करण्याची गरज असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. हे प्रकरण फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवून आरोपीला लवकरात लवकर फाशीची शिक्षा सुनावावी, जेणेकरून भविष्यात अशा प्रकारचे कृत्य करण्याचे धाडस कोणालाही होणार नाही, असा इशाराही देण्यात आला आहे. आरोपीस कठोर शिक्षा झाली नाही तर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# वाडी–वस्तीवर पोहचविण्यात आली शासकीय योजनांची माहिती

### जनकल्याण बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचा उपक्रम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, कामगार वर्गाला शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देणे तसेच गावोगावी मोफत आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून आरोग्य सुविधा पोहोचविण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम जनकल्याण बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे राबविण्यात आला. या उपक्रमाचा समारोप नगर तालुक्यातील बुरुडगाव येथे उत्साहात पार पडला.

या अभियानांतर्गत ग्रामीण भागातील वाड्या–वस्त्यांवर प्रत्यक्ष जाऊन नागरिकांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली. तसेच त्या योजनांचा लाभ कसा घ्यावा याबाबत मार्गदर्शन करून अनेक लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. त्यामुळे तळागाळातील नागरिकांपर्यंत शासनाच्या योजना प्रभावीपणे पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

समारोपीय कार्यक्रमाला जनकल्याण संस्थेचे अध्यक्ष विनोद साळवे, छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे पाटील, बुरुडगावचे सरपंच बापूसाहेब कुलट, तलाठी संभाजी ठोंबरे, उपसरपंच सिराज शेख, सामाजिक कार्यकर्ते जालिंदर वाघ, ग्रामविकास अधिकारी दत्तात्रय शेळके, कृषी सहाय्यक मंदा भारती, सी.एच.ओ. प्रतिनिधी, डॉ. मनीषा लगड, सचिन चौधरी, अंगणवाडी सेविका जया जाधव, मुख्याध्यापक झिने सर, मुख्याध्यापिका थोरात मॅडम यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विनोद साळवे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. शासनाच्या लोककल्याणकारी योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविणे, त्याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन करणे आणि लाभार्थ्यांची नोंदणी करून देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमांतर्गत दरेवाडी गटातील निंबोडी, टाकळी काझी, मदडगाव, दशमीगव्हाण, चिंचोडी पाटील, आठवड, सांडवे, मांडवे, नारायण डोह, वाळुंज, दरेवाडी, वाकोडी, खंडाळा, अरणगाव आदी गावांमध्ये विविध शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

# प्रशिक्षकांकडून मार्गदर्शन आत्मसात करून खेळाडूंनी स्वत:ची शारीरिक क्षमता वाढवावी –ज्ञानेश्वर खुरंगे

### जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या २० दिवसांच्या उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्ह्यातील क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी आणि नवोदित खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने २० दिवसांच्या प्राथमिक व अद्ययावत उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे उत्साहात उद्घाटन करण्यात आले. जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन झाले.

या प्रसंगी क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, संतोष वाबळे, प्रियंका खिंडरे, सोमनाथ गीताराम राऊत, बाणेश्वर क्रीडा मंडळाचे मार्गदर्शक गणेश वारुळे, विश्वंभरा प्रतिष्ठान बुऱ्हाणनगरचे रामेश्वर चिमटे, श्रीराम कुस्ती केंद्राचे मार्गदर्शक सोमनाथ राऊत तसेच कुस्तीपटू सौरभ मराठे आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरात खो–खो, बॅडमिंटन, कुस्ती आणि कबड्डी या खेळांचे प्रशिक्षण दिले जाणार असून शिबिर दोन टप्प्यात आयोजित करण्यात आले आहे. पहिला टप्पा ४ मे ते १३ मे तर दुसरा टप्पा १८ मे ते २७ मे या कालावधीत पार पडणार आहे. जिल्ह्यातील खेळाचा प्रचार व प्रसार वाढवणे, ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंना समान संधी देणे आणि गुणवंत खेळाडू घडवणे हा या शिबिरामागील प्रमुख उद्देश आहे. या माध्यमातून खेळाडूंच्या शारीरिक व मानसिक क्षमतेचा विकास करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

ज्ञानेश्वर खुरंगे म्हणाले की, जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या माध्यमातून आयोजित केलेले हे उन्हाळी प्रशिक्षण शिबिर जिल्ह्यातील क्रीडा चळवळीला बळकटी देणारा महत्त्वाचा टप्पा आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शिक्षणाबरोबरच क्रीडाही तितकीच महत्त्वाची आहे. ग्रामीण भागातील अनेक खेळाडूंमध्ये प्रचंड क्षमता आहे, मात्र योग्य मार्गदर्शन व सुविधा मिळाल्या नाहीत तर ही प्रतिभा दडपून जाते. हेच लक्षात घेऊन आम्ही हे शिबिर आयोजित केले आहे. या शिबिरातून खेळाडूंना केवळ खेळाचे तंत्र नव्हे, तर शिस्त, आत्मविश्वास आणि संघभावना यांचेही शिक्षण मिळणार आहे. प्रशिक्षकांकडून मिळणारे मार्गदर्शन आत्मसात करून खेळाडूंनी स्वतःची शारीरिक क्षमता वाढवावी आणि उच्च स्तरावर पोहोचण्याचे ध्येय ठेवण्याचे त्यांनी आवाहन केले.

शिबिरामध्ये अनुभवी प्रशिक्षकांकडून मार्गदर्शन दिले जात आहे. कुस्ती या खेळासाठी राज्य क्रीडा मार्गदर्शक प्रवीण कोंढावळे, खो–खो साठी संतोष वाबळे तर बॅडमिंटनसाठी विशाल गर्जे यांनी खेळाडूंना प्रशिक्षण देत क्रीडा क्षेत्रातील संधी, तंत्र आणि फिटनेसबाबत सखोल मार्गदर्शन केले.

# ज्ञानसंपदा शाळेत त्रिस्मरणीय दिवसांचे उत्सव साजरे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** १ मे रोजी ज्ञानसंपदा शाळेत महाराष्ट्र दिन, जागतिक कामगार दिन व बुद्ध पौर्णिमा मोठ्या उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरे करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या गायकवृंदाने सादर केलेल्या राष्ट्रगीत, ध्वजगीत व महाराष्ट्र गीताने झाली. तसेच 'माझ्या मराठी भाषेचा लावा ललाटास टिळा' या गीताने मराठी भाषेचा अभिमान जागवला.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. विठ्ठलराव विखे पाटील मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलचे मेडिकल सुपरिंटेंडेंट डॉ. सतीश मोरे तसेच बालरोग तज्ञ डॉ. रवींद्र वाकडे उपस्थित होते. पाहुण्यांचा परिचय मुख्याध्यापिका श्रीमती शिवांजली अकोलकर यांनी करून दिला. संस्थेचे अध्यक्ष श्री प्रवीण बजाज व उपाध्यक्ष मिलिंद गंधे यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. सतीश मोरे यांनी आरोग्य जपण्याचे महत्त्व सांगत मानसिक, सामाजिक व आध्यात्मिक आरोग्याबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले.

उपाध्यक्ष मिलिंद गंधे यांनी शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी आयुष्मान भारत योजनेअंतर्गत विमा सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची घोषणा केली व कोणतेही काम कमी दर्जाचे नसते, हा मोलाचा संदेश दिला.

विद्यार्थिनींनीही आपली मनोगते प्रभावीपणे मांडली. कु. श्रेया करवंदे (कामगार दिन), कु. श्रुती गहिरे (महाराष्ट्र दिन) व कु. खुशी काळे (बुद्ध पौर्णिमा) यांनी आपल्या भाषणातून महत्त्वपूर्ण विचार मांडले.

स्व.शंकरराव घुले यांच्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन

## स्व.शंकरराव घुले यांच्या लढ्यामुळे कष्टकऱ्यांचे जीवनमान उंचावले - अविनाश घुले



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** कष्टकरी हा समाजाचा कणा आहे आणि तो मजबूत राहिला पाहिजे. यासाठी स्व.शंकरराव घुले यांनी मोठं,मोठं आंदोलने उभे केले. हमाल पंचायतच्या माध्यमातून हमालांच्या पाठीवरचे ओझे कमी करुन खर्या अर्थाने त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. माथाडी कामगारांना त्यांचे हक्क मिळवून दिले. बाजार समितीच्या हमाल-मापाड्यांच्या प्रश्नांसाठी सरकार विरोधात आंदोलन उभे करुन अनेक प्रश्न मार्गी लावले. त्यांनी कष्टकर्यांसाठी उभारलेल्या लढ्याला राज्यभरातून समर्थन मिळाले. त्यांचा लाभ राज्यातील कष्टकर्यांनाही झाला. त्याचप्रमाणे नगराध्यक्ष, विविध संस्थांचे पदाधिकारी म्हणून त्यांनी आपल्या कार्याने एक वेगळी ओळख निर्माण केली. त्यांचे कार्य आजही सर्वांसाठी दिशादर्शक असेच आहे, असे प्रतिपादन हमाल पंचायतचे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले यांनी केले.

कष्टकर्यांचे नेते स्व.शंकरराव घुले यांच्या स्मृतीदिनानिमित्त मार्केट यार्ड, हमाल पंचायत येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी हमाल पंचायतचे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले, उपाध्यक्ष गोविंद सांगळे, सचिव मधुकर केकाण,संजय घुले , सल्लागार अशोक बाबर, विष्णुपंत म्हस्के, सतीश शेळके , बहिरू कोतकर ,रविंद्र भोसले, सुनिल देवकर ,नारायण गीते , लक्ष्मण वायभासे, सुनील गीते ,विष्णू ढाकणे ,मच्छिंद्र दहिफळे, राजू चोरमले रत्नाबाई आजबे, आदिनाथ चेके, शेख अब्दुल गनी, नवनाथ महानुर ,श्रीमती कमल ढाणे ,चांगदेव कुसळकर, सचिन ठुबे ,डॉ.विजय कवळे, माणिक व्यवहारे,मंगेश एरंडे ,भगवान सांगळे ,सुरेश निरभवणे ,अशोक काळे ,नंदू डहाणे ,सुसे , सर्व कर्मचारी वृंद आदी उपस्थित होते.

याप्रसंगी गोविंद सांगळे म्हणाले, कष्टकरी आणि शंकरराव घुले यांचे अतुट नाते होते. कष्टकर्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी विविध पातळ्यांवर त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्या हक्कांसाठी जनआंदोलन उभे करुन विकास साधण्यात आला आहे. कष्टकर्यांच्या आरोग्य सेवेसाठी हॉस्पिटल, आर्थिक पत निर्माण होण्यासाठी पतसंस्था, गुणवंत कामगार व त्यांचे पाल्य यांचा सन्मान केला. कष्टकर्यांना स्वत:ची पत निर्माण करण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहिला आहे. त्यांचे विचार आणि कार्य आपण हमाल पंचायतीच्या माध्यमातून पुढे नेत असल्याचे सांगितले.

याप्रसंगी सचिव मधुकर केकाण म्हणाले, प्रत्येकाला आपल्या हक्कासाठी संघटन हे महत्वाचे असते. संघटनेच्या माध्यमातून दिलेल्या लढ्याला यश नक्कीच मिळत असते. स्व.शंकरराव घुले यांनी कष्टकर्यांचे मोठे संघटन उभे केले त्यामुळेच त्यांना त्यांचे हक्क मिळाले. त्यांच्यासारख्या नेतृत्वामुळे सरकारला कष्टकर्यांसाठी निर्णय घेणे भाग पाडले. त्यांचे हेच संघटन आजही कायम असून, त्या माध्यमातून कष्टकरी, कामगार आपले हक्क मिळवत आहेत, ही त्यांच्या कार्याची ओळख कायम राहील, असे सांगितले.

## ब्राह्मण सेवा संघ, केडगावकडून राज्यभरात विक्रमी २२ सामुदायिक व्रतबंध सोहळे संपन्न

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगर ब्राह्मण समाजातील अत्यंत महत्त्वाचा समजला जाणारा व्रतबंध (उपनयन संस्कार/मुंज) हा संस्कार ब्राह्मण सेवा संघ, केडगाव यांच्या वतीने यंदा संपूर्ण महाराष्ट्रात विक्रमी पातळीवर पार पडला. दि. ३ मे २०२६ रोजी एकाच दिवशी सुमारे २२ सामुदायिक व्रतबंध सोहळ्यांचे आयोजन करून संघटनेने एक उल्लेखनीय विक्रम नोंदविला आहे.

व्रतबंध हा मुलाच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जातो. शिक्षणासाठी गुरुगृही पाठवण्यापूर्वी हा संस्कार करण्याची परंपरा असून त्याला धार्मिक व सांस्कृतिक दृष्ट्या विशेष महत्त्व आहे. आधुनिक काळातील धावपळ, वेळेची कमतरता आणि वाढते आर्थिक ओझे लक्षात घेता, सामुदायिक पद्धतीने हा संस्कार करण्याची संकल्पना अधिक उपयुक्त ठरत असल्याचे यावेळी अधोरेखित झाले.

ब्राह्मण सेवा संघ, केडगावतर्फे गेल्या तब्बल २८ वर्षांपासून सातत्याने सामुदायिक व्रतबंध सोहळ्यांचे आयोजन करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, ज्यांची आर्थिक परिस्थिती प्रतिकूल आहे अशा कुटुंबांतील मुलांचे व्रतबंध मोफत करून समाजाभिमुख कार्याचा आदर्श संघटनेने जपला आहे. याबाबत माहिती देताना संघाचे अध्यक्ष श्री. नंदकुमार पोळ यांनी सांगितले की, ''समाजातील प्रत्येक घटकाला धार्मिक संस्काराची संधी



मिळावी, हा आमचा मुख्य उद्देश आहे.''

या भव्य सोहळ्याचे पौरहित्य वेदमूर्ती पंढरपूरकर गुरुजी यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विधी शास्त्रोक्त पद्धतीने पार पडले. सोहळ्याचा एक विशेष आकर्षण म्हणजे सर्व बटूंची पारंपरिक वेशभूषेत वाजतगाजत काढण्यात आलेली मिरवणूक, ज्यामुळे परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले.

याच कार्यक्रमात नुकत्याच झालेल्या ऋग्वेद कंठस्थ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शृंगेरी पीठाच्या शंकराचार्यांकडून सन्मानित झालेल्या श्री. वेदांत कुलकर्णी (पंढरपूरकर) यांचा विशेष सत्कार करण्यात आला.ते गेल्या चौदा वर्षांपासून आबासाहेब पटवर्धन वेदशास्त्र विदयालय,पुणे येथे वेदाचार्यश्रीपादशास्त्री धायगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यापन करत आहेत.

विशेष म्हणजे पुरस्कारार्थी श्री वेदांत हे वेदमूर्ती श्री. पंढरपूरकर गुरुजी यांचे चिरंजीव आहेत, ही बाब उपस्थितांसाठी अभिमानास्पद ठरली.

कार्यक्रमाला विविध मान्यवरांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. यामध्ये मा. आमदार संग्रामभैय्या जगताप, श्री. सचिनजी जगताप, नगरसेवक श्री. अमोल येवले, नगरसेवक श्री. विजय पठारे, सौ. प्रियाताई जानवे, श्री. विवेक नाईक आणि श्री. योगेश दाणी यांचा समावेश होता.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. यामध्ये डॉ. श्रीकृष्ण जोशी, ज्ञानेश देशपांडे, प्रशांत देशपांडे, आनंद ठिपसे, दिलीप इनामदार, पंकज जहागीरदार, नितीन क्षीरसागर, धनंजय जामगांवकर, मिलिंद वडाळकर, डॉ. सुधीर कुलकर्णी, विनायक कुलकर्णी, नंदकुमार कुलकर्णी, राजेश कळसे, अजित कुलकर्णी, किरण कुलकर्णी, राहुल पांडव, गिरीश क्षीरसागर, योगी क्षीरसागर, किरण खुर्जेकर तसेच तेजस्विनी महिला ग्रुप यांचा विशेष उल्लेख करण्यात आला.

एकूणच, ब्राह्मण सेवा संघ, केडगाव यांच्या या उपक्रमामुळे पारंपरिक संस्कार जपत समाजातील सर्व स्तरांपर्यंत धार्मिक विधी पोहोचवण्याचे कार्य प्रभावीपणे घडून आले असून, हा उपक्रम इतरांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

## थोड्या गप्पा आणि थोडी गाणी'' कार्यक्रमाने रंगला सांस्कृतिक सोहळा

### गणेश शिंदे व सन्मिता शिंदे यांच्या सादरीकरणाला उत्स्फूर्त प्रतिसाद । सांस्कृतिक कार्यक्रमातून संस्कृती जपण्याचा संदेश

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा) यांच्या वतीने सभासद व त्यांच्या कुटुंबीयांसाठी आयोजित करण्यात आलेला ''थोड्या गप्पा आणि थोडी गाणी'' हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात व्याख्याते गणेश शिंदे आणि सन्मिता शिंदे यांच्या मनमोहक सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाची सुरुवात सन्मिता शिंदे यांनी सादर केलेल्या ''कानडा राजा पंढरीचा'' या भक्तीगीताने झाली. त्यांच्या सुरेल गायनाने वातावरण भारावून गेले. त्यानंतर गणेश शिंदे यांनी आपल्या आयुष्यातील अनुभव, साध्या घरातून झालेली जडणघडण आणि संस्कार यावर मनमोकळ्या गप्पा मारत उपस्थितांशी संवाद साधला. हलक्या-फुलक्या विनोदातून त्यांनी सामाजिक भान जपण्याचा संदेश देत उपस्थितांचे मनोरंजनही केले.

यावेळी गणेश शिंदे म्हणाले की, आपली भूमी साधुसंतांच्या पदस्पर्शाने पावन झाली असून भारतीय संस्कृती अत्यंत महान आहे. सण-उत्सव, धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून या संस्कृतीचे जतन होत असते. धकाधकीच्या जीवनात आनंद टिकवण्यासाठी अशा कार्यक्रमांची गरज





असल्याचे त्यांनी नमूद केले.

संस्थेचे अध्यक्ष अभिजीत देवी यांनी कार्यक्रमाचे उद्दिष्ट स्पष्ट करत सांगितले की, सभासद आणि त्यांच्या कुटुंबीयांना एकत्र आणून विचारांची देवाणघेवाण आणि परस्परांतील संबंध अधिक दृढ करण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष अजय दगडे यांनी नियोजनबद्ध आयोजनामुळे कार्यक्रमाला ३०० हून अधिक सभासद व कुटुंबीयांनी उपस्थिती लावल्याचे सांगितले.

गणेश शिंदे आणि सन्मिता शिंदे यांनी देश-विदेशात अनेक कार्यक्रम सादर केले असून त्यांना अहिल्यानगरबद्दल विशेष आपुलकी असल्याचे त्यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाचा समारोप सन्मिता शिंदे आणि अजय दगडे यांनी सादर केलेल्या ''अश्विनी ये ना'' या गाण्याने झाला. या सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

या कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष प्रदीप तांदळे, सचिव भूषण पांडव, खजिनदार सुनील औटी, संतोष खांडेकर, आदिनाथ दहिफळे, जितेश सचदेव, संजय चांडवले, सचिन डागा, अनमोल जैन, संकेत पादिर, गौरव मांडगे, सुनील हळगावकर, सुरेश परदेशी, शैलेश सप्रे, प्रकाश जैन, मिनल काळे, इक्बाल सय्यद, विकार काझी, अशोक मवाळ तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केडगाव स्पोर्ट्स अ‍ॅकॅडमीचे ७ खेळाडू अहिल्यानगर बास्केटबॉल संघात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सातारा येथे होणाऱ्या सब ज्युनिअर बास्केटबॉल स्पर्धेसाठी केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या सात खेळाडूंची अहिल्यानगर सब ज्युनिअर संघात निवड झाली आहे. मुलांमध्ये ध्रुव गुगळे, आदिराज कोतकर, कृष्णा ठुबे, क्रांतिक बढदे , शिवराज भस्मे ,मुलीमध्ये,तनिष्का बारहाते, अक्षरा कोतकर यांचा समावेश आहे.

नुकतेच सातारा येथे महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल असोसिएशन





सब ज्युनिअर स्पर्धेला प्रारंभ झाले असून, या स्पर्धेमध्ये सदर खेळाडू अहिल्यानगर संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. खेळाडूंना प्रशिक्षक छबुराव कोतकर व स्वाती बारहाते यांचे मार्गदर्शन मिळाले. या यशाबद्दल संघटनेचे अध्यक्ष बाबासाहेब कोतकर, ऊर्जा गुरुकुल शाळेच्या संचालिका कल्याणी फिरोदिया, ज्ञानसाधना गुरुकुल कलासेसचे संचालक प्रा. प्रसाद जमदाडे, डॉ. देवेश कुमार बारहाते, विक्रम लोखंडे, यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## आर्ट ऑफ लिव्हिंगच्या इंट्युशन शिबिराला प्रतिसाद; पालकांच्या आग्रहास्तव पुन्हा आयोजन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आर्ट ऑफ लिव्हिंगतर्फे आयोजित करण्यात आलेल्या ''इंट्युशन प्रोग्राम'' (अंतर्ज्ञान प्रक्रिया शिबिर) ला शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, हे शिबिर यशस्वीरित्या संपन्न झाले आहे. उन्हाळी सुट्टीच्या पार्श्वभूमीवर ५ ते १८ वयोगटातील मुलांसाठी आयोजित या उपक्रमात सुमारे ५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. शिबिरातील विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल घडून आल्याचे चित्र पाहायला मिळाले.

गावडे मळा येथील आर्ट ऑफ लिव्हिंगच्या ज्ञान क्षेत्रात पार पडलेल्या या शिबिरात अनुभवी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली योग, प्राणायाम आणि सुदर्शन क्रिया यांचे सत्र घेण्यात आले. या माध्यमातून मुलांची एकाग्रता, स्मरणशक्ती आणि निर्णयक्षमता विकसित करण्यावर विशेष भर देण्यात आला.

शिबिरादरम्यान डोळ्यांवर पट्टी बांधून वस्तू ओळखणे, फोटो मेमरी वाढवणे यांसारख्या प्रयोगात्मक सत्रांना विद्यार्थ्यांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. सांघिक खेळ, बौद्धिक उपक्रम आणि सर्जनशील क्रियाकलापांमुळे मुलांचा सहभाग अधिक सक्रिय झाला. परिणामी, मुलांमध्ये आत्मविश्वास वाढणे, मोबाईलचा वापर कमी होणे आणि सकारात्मक विचारसरणी विकसित होणे असे अनेक चांगले बदल जाणवतात.

पालकांकडूनही या उपक्रमाचे मनापासून कौतुक करण्यात आले. अशा प्रकारचे आध्यात्मिक व व्यक्तिमत्व विकास घडवणारे शिबिर सुट्टीत वारंवार आयोजित करावेत, अशी मागणी अनेक पालकांनी व्यक्त केली. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, पुन्हा या उन्हाळी सुट्टीमध्ये मुलांसाठी ''अंतर्ज्ञान प्रक्रिया इन्ट्युशन शिबिर'' आणि मोठ्यांसाठी ''हॅप्पीनेस प्रोग्राम'' योगा प्राणायाम ध्यान जगप्रसिद्ध सुदर्शन क्रिया आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम दि. ५ ते १० मे २०२६ दरम्यान दररोज सकाळी आणि संध्या. प्रा. आर. बी. कुलकर्णी सभागृह, मिस्कीन मळा, जॉगींग पार्क-गंगा उद्यान रोड, अहिल्यानगर येथे होणार आहे.

या कार्यक्रमामध्ये तणावमुक्त मन, निरोगी शरीर, आत्मविश्वास वाढ, रोगप्रतिकारक शक्ती वृद्धिंगत होणे, एकाग्रता व सकारात्मकता वाढणे, व्यसनमुक्ती तसेच शांती, आनंद आणि उत्साहाचा अनुभव मिळणार आहे. इच्छुकांनी ९४२२२२०८७४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

अशा प्रकारे इंट्युशन शिबिर आणि हॅप्पीनेस प्रोग्रामच्या माध्यमातून अहिल्यानगरमध्ये सकारात्मक, निरोगी आणि आनंदी जीवनशैलीचा संदेश अधिक व्यापक पातळीवर पोहोचणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## मिश्रा यांनी शहराचे नाव उंचावले - संपत बारस्कर

### अनुराधा मिश्रा यांचा राष्ट्रवादीच्या वतीने सन्मान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** नाशिक जिल्ह्यातील लासलगाव येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत अहिल्यानगरच्या अनुराधा रत्नेश मिश्रा यांनी अप्रतिम कामगिरी करत तीन सुवर्ण पदके पटकावली. यासोबतच त्यांना 'स्ट्राँग वुमन ऑफ महाराष्ट्र २०२६' हा मानाचा किताबही बहाल करण्यात आला. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक संपत बारस्कर यांच्या हस्ते मिश्रा यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अरंडे सर, दिपक दहे, कारभारी शेंडे, मेजर सचिन पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. अनुराधा मिश्रा यांनी पॉवरलिफ्टिंग, बेंच प्रेस आणि डेडलिफ्ट या तिन्ही प्रकारांमध्ये दमदार प्रदर्शन करत सुवर्ण पदकांची कमाई केली. विशेष म्हणजे, अनुराधा मिश्रा यांनी यापूर्वीही आशियाई पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

संपत बारस्कर म्हणाले की, अनुराधा मिश्रा यांनी पॉवरलिफ्टिंगसारख्या कठीण क्रीडा प्रकारात राज्य व राष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. आजच्या काळात महिलांनी प्रत्येक क्षेत्रात आपली छाप उमटवली आहे, 'स्ट्राँग वुमन ऑफ महाराष्ट्र' हा किताब पटकावून अहिल्यानगर शहराचे नाव उंचावले असल्याचे स्पष्ट करुन त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

(पान १ वरून)

## स्वगणनेत नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा - सभापती प्रा. राम शिंदे

नागरिकांना स्वगणनेची सुविधा उपलब्ध असून, त्यानंतर दि. १६ मे ते १४ जून दरम्यान प्रगणकांकडून घरोघरी जाऊन जनगणना करण्यात येणार आहे. जनगणनेच्या या उपक्रमामुळे अचूक व अद्ययावत माहिती संकलित होऊन शासनाच्या विविध योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यास मदत होणार आहे. डिजिटल जनगणनेमुळे प्रक्रिया सुलभ, जलद व पारदर्शक होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

''जाणकार नागरिक – सक्षम राष्ट्र'' ही भावना जपत प्रत्येकाने या ऐतिहासिक उपक्रमाचा भाग व्हावे.

देशाच्या सर्वांगीण विकासासाठी स्वगणना ही महत्त्वाची पायरी असून, सर्वांनी जबाबदारीने सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रा. राम शिंदे यांनी केले.

## अहिल्यानगरमध्ये पाणीपुरवठ्याचा बोजवारा

असून दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे.

नागरिकांनी पाणीपुरवठ्याबाबत माहिती घेण्यासाठी संबंधित वॉलमनशी संपर्क साधला असता, त्यांच्याकडून उडवाउडवीची व उध्दट उत्तरे दिली जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. तसेच पाणीपुरवठ्याची नोंद ठेवण्यासाठी आवश्यक असलेली डायरी व्यवस्थित न भरणे, नागरिकांच्या स्वाक्षऱ्या न घेणे अशा प्रकारच्या बेजबाबदार वर्तणुकीमुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे.या संपूर्ण प्रकारामुळे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याचा फटका प्रभागातील लोकप्रतिनिधींनाही बसत असून त्यांना नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे.या पार्श्वभूमीवर शहरातील विस्कळीत झालेला पाणीपुरवठा तात्काळ सुरळीत करावा, वॉलमनच्या बेजबाबदार वर्तणुकीवर कठोर कारवाई करावी तसेच पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख, प्रभाग अधिकारी, हेड वॉलमन व संबंधित कर्मचाऱ्यांची तातडीची बैठक आयोजित करून ठोस निर्णय घ्यावेत, अशी ठाम मागणी नगरसेवकांनी केली आहे.

## शिरसाटवाडीतील विकास कामांची शासकीय कमिटीकडून पाहणी, अधिकाऱ्यांकडून कामाचे कौतुक

यांचे कौतुक कमिटीने केले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य तथा मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे, ग्रामसेवक अशोक साळुंखे, ग्रामपंचायत सदस्य जनाबाई शिरसाट, कर्मचारी अंकुश शिरसाट, अशोक फुंदे, बाबुराव शिरसाट उपस्थित होते.जिल्ह्यात मनसेची सत्ता असलेली शिरसाटवाडी ही एकमेव ग्रामपंचायत असून जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांच्या पत्नी सौ. भावना पालवे या सरपंच आहेत